Since March 2002
A National, Registered & Refereed Monthly Journal :
Marathi Literature
Research Link - 173, Vol - XVII (6), August - 2018, Page No. 75-76
ISSN - 0973-1628 ■ RNI - MPHIN-2002-7041 ■ Impact Factor - 2015 - 2.782

# भाषाशुद्धीचे पुरस्कर्ते : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

*आपण मराठी बोलताना व लिहिताना मराठीच शब्द वापरावेत, त्यात शक्यतो परभाषेचे शब्द येऊ देऊ नयेत, हा आहे भाषाशुद्धीचा अर्थ पुण्यातले सुप्रसिद्ध विद्वद्वर्य श्री दत्तो वामन पोतदार हे 1936 मध्ये, रत्नागिरीत जाऊन सावरकारांना भेटले. त्या भेटीची आठवण त्यांनीच लिहून ठेवली आहे ती अशीः ''आम्ही भाषाशुद्धीवरच बोललो. तात्याराव, आम्ही जे परकीय शब्द आत्मसात केले, नि पचवून टाकले, ती आहेत आमची विजय-चिन्ह. असं मी म्हणताच सावरकर ताडकन् म्हणाले, दत्तोपंत, चुकताय आपण. ती काही आमची विजय-चिन्हं नाहीत, ते तर आमच्या भाषेच्या अंगावरचे व्रण आहेत व्रण!''*

**डॉ.जयश्री शास्त्री**

राष्ट्रीयत्वाचे दर्शनकार, उद्‌बोधक पत्रकार अनुपम वक्ता, अस्पृश्यता निवारक समाजसुधारक, प्रचारक नाटककार धैर्यशील साहसी, विज्ञाननिष्ठ, हिन्दु–राष्ट्र–ध्वजाचे भाष्यकार, विवेकशील नेता, अद्वितीय राजनीतिपटू निष्कलंक आरोपी, उपयुक्तवादी तत्वज्ञ, शुध्दिकार्याचे प्रणेते, संस्कृतनिष्ठ हिंदीचे कैवारी, श्रेष्ठतम महाकवी राष्ट्रीय कालदर्शकाचे दिग्दर्शक, नागरीलिपीचे सुधारक असे कितीबरं आयाम स्वा. सावरकरांचे वर्णन करावे. भव्यदिव्य अशा बहुआयामी व्यक्तिमत्वाचे ते धनी होते. त्यांच्या जीवनातील प्रत्येक कार्याचे अनमोल महत्व आहे त्याचप्रमाणे स्वा. सावरकरांच्या भाषाशुध्दीच्या पुरस्करणाचे आगळे महत्व आहे.

हिन्दुह्रदयसम्राट, क्रांतिकारकाचे मुकुटमणी, मृत्युंजय स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर म्हणजे लोकोत्तर व्यक्तींपैकीच आहेत, ज्यांचा जन्म महाराष्ट्रात झाला आणि ही मुळची पवित्र भूमी अधिक पुण्यपावन झाली. स्वा. सावरकरांचे चरित्र म्हणजे भारताच्या अर्वाचीन इतिहासातील एक महान पर्व आहे. या पर्वावर अनेक लहान मोठे ग्रंथ झालेत. ज्यांच्या कार्यावर आजतागायत अनेक लोक आवाक् होऊन बोलत आहेत. ''स्वातंत्र्यवीर सावरकरांचे चरित्र म्हणजे ज्वालामुखी त्यांचे विचार म्हणजे लाव्हारस. सावरकरांची विचार–प्रतिभा महान दृष्टयाची होती. त्यांची काव्यप्रतिभा तुरूंगाच्या स्फोटक दारूसारखी धगधगीत आणि पारिजातकाच्या फुलाइतकीच कोमल होती. त्यांचा पराक्रम, त्यांचा त्याग, त्यांची निष्ठा त्यांचे वक्तृत्व, विद्‌वत्ता, सेनापतित्व, कल्पकता इत्यादी साऱ्याच गुणांना एकच विशेषण अचूक ठरेल. 'असामान्य' हेच ते विशेषण.'' असे गौरवोद्‌गार आहेत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे. भाषाशुध्दीचे पुरस्कर्ते स्वा.वि.दा. सावरकर हा एक त्यांच्या दिव्य व्यक्तिमत्वाचा लक्षणीय भाग होता.

राष्ट्रहिताचा चौफेर विचार करताना सावरकरांना जे जे राष्ट्राच्या हिताचे वाटे त्यांच्याकडे त्यांनी आवर्जुन लक्ष वेधले. भाषाशुध्दी हा असाच एक राष्ट्रहिताचा, स्वत्व रक्षणाचा विषय असल्याने, त्याचा त्यांनी वाणीने, लेखणीने आमरण पुरस्कार केला.

सावरकर ज्याला 'भाषाशुध्दि' म्हणत त्याचा अर्थ जरा वेगळा आहे. लिहिताना वा बोलताना आपली भाषा शुध्द म्हणजे व्याकरण–शुद्ध हवी असा इथे अभिप्राय नाही. सुशिक्षित व्यक्तीची भाषा व्याकरण–शुद्ध हवी हे सांगायलाच नको.

परंतु आपण मराठी बोलताना व लिहिताना मराठीच शब्द वापरावेत; त्यात शक्यतो परभाषेचे शब्द येऊ देऊ नयेत, हा आहे भाषाशुद्धीचा अर्थ पुण्यातले सुप्रसिध्द विद्‌वद्‌वर्य श्री. दत्तो वामन पोतदार हे 1936 मध्ये, रत्नागिरीत जाऊन सावरकरांना भेटले. त्या भेटीची आठवण त्यांनीच लिहून ठेवली आहे ती अशीः ''आम्ही भाषाशुद्धीवरच बोललो. 'तात्याराव, आम्ही जे परकीय शब्द आत्मसात केले, नि पचवून टाकले, ती आहेत आमची विजय–चिन्ह. असं मी म्हणताच सावरकर ताडक्न म्हणाले, दत्तोपंत, चुकताय आपण. ती काही आमची विजय–चिन्हं नाहीत; ते तर आमच्या भाषेच्या अंगावरचे व्रण आहेत व्रण!'' (सा.आ.पृ. 101) जेते हे जित राष्ट्राचा स्वत्वाभिमान मारायचा प्रयत्न करतांना त्यांच्या भाषेवर प्रथम आक्रमण करीत असतात. गिबन यानं म्हटलंय की 'ग्रीसवर रोमची संस्कृती ही रोमन भाषेच्या प्रसारानं लादली गेली' (गिबन : डिक्लाइन ॲंड फॉल ऑफ दि रोमन एंपायर खं. ? "So Sensible were the Romans of the influence of language over national manners, that if was their most serious care to extend with progress of their arms the use of the latin tongue." यावरून कळेल, की परकीय संस्कृतीच्या आक्रमणापूर्वी परकीय भाषेचं आक्रमण होत असतं. पूर्वी इथे आक्रमण केलेल्या मुसलमानांनी नि इंग्रजांनी हेच केलं.

स्वा. सावरकरांनीच केवळ भाषाशुद्धीची आपली नवी टूम काढली असे नव्हे. तर शिवाजी महाराजांच्या वेळी, मराठीत यावनी भाषेतले

*लोकमान्य महाविद्यालय, वरोरा-चंद्रपूर ( महाराष्ट्र )*

88 टक्के शब्द घुसले होते, असं इतिहासाचार्य राजवाडे यांनीच म्हटले आहे. म्हणून तर, स्वराज्य स्थापन होताच शिवरायांनी रघुनाथ पंडितांना 'राज – व्यवहार – कोष' करण्याची आज्ञा केली. शिवाजी महाराजांनी या कोषाच्या उदाहरणानं हेच शिकवलं, की पारतंत्र्यातून मुक्त झालेल्या राष्ट्राने परकीय नेत्यांच्या वर्चस्वाचे जे जे अवशेष आपल्या जीवनात रुतून बसलेले असतील ते ते समूळ दपटले पाहिजेत, आणि आपलं जीवन विशुध्द नि स्वाभिमानी बनवलं पाहिजे. या दृष्टीने, स्वभाषेचे रक्षण नि संवर्धन करणे हे प्रत्येकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

आपल्या भाषेत परभाषांचे शब्द कां नि कसे घुसतात याचा सांगोपांग विचार प्रथम सावरकरांनीच केला. त्यांना आढळले, की आपण बहुधा हयगय करून, कधीकधी निरूपाय म्हणून आणि इतर वेळी केवळ ऐट म्हणून आपल्या बोलण्या–लिहिण्यात परकीय शब्द वापरतो. ते जितके अधिक वापरले जातात, तितके त्या अर्थाचे आपले शब्द मागे पडतात; आणि तो अर्थ वा भाव त्या परकीय शब्दांनीच व्यक्त करायची सवय जडते पुढे पुढे त्यावर शब्दावाचून तो अर्थ व्यक्तच होत नाही असे वाटू लागते. ते परशब्द असे एकदा रुढ झाले, की मग ते आपलेच झाले, ते पचले, ती आपली विजय–चिन्हे आहेत, असं त्यांच्या विषयी खुळं मोठयांची महत्व वाटू लागतं. अशा टप्प्यांनी पर–शब्द आपल्या भाषेच्या हाडीमाषी रुतून बसतात. तसेच लहान मुले भाषा शिकतात ती मोठयांची ऐकून अशावेळी बोलताना 'क्रॉस' हा ओलांडणे 'ॲक्सिडेंट' ला 'अपघात', 'ऑफीस' ला कार्यालय, 'रिझर्वेशन' ला आरक्षण असे शब्द वापरले गेले तरच विशुध्दता जोपासली जाईल.

यासाठी, मराठीत घुसलेले परकीय शब्द ओळखता यावेत आणि तदर्थक मराठी शब्द ठाऊक व्हावेत, म्हणून सावरकरांनी 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' हे पुस्तकही लिहिले आणि त्यात शेवटी परकीय–स्वकीय शब्दांचा कामचलाऊ कोणही जोडला. त्यावर उलट–सुलट चर्चा टीका होऊ लागली. तेव्हा जे जे आक्षेप घेतले जात त्यांची ते उत्तरेही देत. भाषाशुद्धीवर सावरकरांनी पहिला लेख 1925 मध्ये लिहिला, आणि शेवटचा लेख लिहिला 'केसरी' त 1951 मध्ये. सतत पंचवीस वर्षे ते भाषाशुद्धीचा नेटाने प्रचार करीत होते. पुढे नूतन विद्यालय 'हायस्कुल' होतं. त्यांची 'प्रशाळा' झाली. अत्रे हे 'प्रिन्सिपल' होते. त्यांचे 'आचार्य' झाले. ते सावरकरामुळेच. 1940 पर्यंत श्री. वेलणकर हे सांगलीच्या गजानन मिलचे 'मालक' होते. पण 30 जुलै 1941 ला सावरकर तिथे गेले असता, त्यांनी वेलणकरांना समजवलं की 'परक्या मालकानं या देषाच्या धन्याला पूर्वी खो दिला; पण आता आपण त्याला खो देऊन पुनः 'धनी' (किंवा 'स्वामी') नको का व्हायला ?' वेलणकरांना आपली, चुक समजली आणि तेव्हापासून 'धनी वेलणकर' असा शब्द प्रयोग त्यांनी रूळवला. तसेच 1937 (20 जुन) ला कोल्हापूरच्या 'हंस पिक्चर्स' ला सावरकरांनी भेट दिली, तेव्हा तिथे त्यांना सर्व इंग्रजी पाट्या दिसल्या. म्हणून, त्यांनी श्री. बाबुराव पेंढारकरांना मराठी पाट्या लावण्याचं महत्त्व पटवलं, आणि लगेच मराठी प्रतिशब्दही सुचविले. चित्रपट, बोलपट, दिग्दर्शक, कलागृह, छाया–चित्रण, इ. बाह्य – चित्रण, ध्वनी – लेखन इ. शब्द हे 1937 मध्ये सावरकरांमुळेच मराठीत आले नि रूळले, हे आज सांगितलं तरच कळेल. तसेच दिनांक (तारीख), क्रमांक (नंबर), उपस्थित (हजर), प्रतिवृत्त (रिपोर्ट), इतिवृत्त (अहवाल), नगरपालिका (म्युनिसिपॉलिटी), महापालिका (कॉर्पोरेशन), महापौर (मेयर), पर्यवेक्षक (सुपरवायझर), विश्वस्त (ट्रस्टी), तुरंत (अर्जंट), गणसंख्या (कोरम), स्तंभ (कॉलम), मूल्य (किंमत), शुल्क (फी), हुतात्मा (षहीद), निर्बंध (कायदा), शिरगणति (खानसुमारी) स्वकीय शब्दांवर कुरघोडी मात्र होता कामा नये. भाषाशुद्धीचे महत्व समजावताना सावरकरांनी तीन फार चांगले दृष्टांत दिले आहेत. ते म्हणतात की, 'स्वकीय शब्द नामशेष करून परकीय शब्द बोकाळू देणं हे औरस मुलांना मारून, दुसरी दत्तक मुलं घेण्यासारखं आहे' आपली संस्कृत भाषा किती संपन्न आहे ! तिला अव्हेरून, इंग्रजी, फार्शी इ. दुसऱ्या परक्या भाषांतून शब्द घेणं म्हणजे 'घरात असलेली सोन्याची वाटी फेकून देऊन, चिनी मातीचे कप हाती घेण्यासारखं नाही का ?' सूर्य, चंद्र यांना इंग्रजीत एकेकच शब्द, पण संस्कृतात त्यांना किती तरी पर्याय आहे. 'अशी बहुमोल खाण घरच्या अंगणात असतांना परक्यांच्या दारी भीक का मागता ?' असे ते म्हणत.

परकीय शब्दांना मी सुचविले तेच मराठी शब्द वापरा, असा सावरकरांचा दुराग्रहही नव्हता. सोपे सुट–सुटीत अर्थवाहक शब्द इतरांनी अवश्य सुचवावेत असेच ते सदोदित सांगत.

अशाप्रकारे मराठीचा षब्दसंग्रह 'अद्यावत' करण्याचे कार्य महाराष्ट्रातल्या प्रगतिशील विद्यापीठांत भाषा मंडळांतून होणे अपेक्षित होते, जे कार्य आजतागायत अगदी महाजालाच्या काळातही चालले आहे.

शके 1888 च्या फाल्गुन शुद्ध षष्ठीला म्हणजेच 26 फेब्रु. 1966 ला त्यागवीर सावरकरांनी देहत्याग केला.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा स्मृतीदिन आणि भाषाशुद्धीच्या त्यांच्या कार्याचा हेतु जरी लक्षात घेतला तरी भारत प्रत्येक क्षेत्रात 'अद्यावत' च नव्हेतर 'अग्रेसर' व्हावा यासाठी तळमळणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुण्यात्म्याला समाधान लाभेल. त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन !


<u>संदर्भ</u> :

*(1) देसाई, ह.त्र्यं. (1983) : **शतपैलू सावरकर**, राजहंस प्रकाशन.*

*(2) सावरकर, वि. दा. (1993) : **समग्र सावरकर**, खंड 7 वा, वीर सावरकर प्रकाशन.*

*(3) स्वा. सावरकर (2012) : **भाषाशुद्धि**, जनआवृत्ती, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.*